# यशोगाथा

| | |
|---|---|
|  | **Name-Umesh Madhav Khirade**<br>**School-Primary Teacher Zilla Parishad**<br>**School Ujjaini**<br>**Tal-WADA Dist –Palghar** |

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत श्री. उमेश माधव खिराडे जि.प.शाळा उज्जैनी ता. वाडा. जि. पालघर यांनी 100% हगणदारीमुक्त करण्याच्या दृष्टीने महत्वाची भुमिका पार पाडली आहे. या कार्यात त्यानी स्वत: लिहलेले हगणदारीमुक्त गाव या पथनाटयाव्दारे जनजागृती केली त्यात त्यांना श्रीम. उर्मिला खिराडे व वृषाली गायकर यांचे मालाचे सहकार्य लाभले हे कलापथक, पालघर जिल्हयातील ग्रामपंचायतीमधुन विविध ठीकाणी सादर केले जाते. आजवर या पथनाटयाव्दारे अनेक जनांना गाव हगणदारीमुक्त करण्यासाठी प्रेरणा दिली आहे. सदर पथनाटयाचे मा. ग्राम विकास मंत्री. श्रीम.पंकजाताई मुंडे, मा. शिक्षणमंत्री. श्री.विनोद तावडे , मा. राज्यमंत्री ग्राम विकास श्री.दादा भुसे  मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर, श्रीम. निधी चौधरी, गट विकास अधिकारी, श्रीम. राजलक्ष्मी एरपुडे आदि मान्यवरांनी या कलापथकाचे कौतुक केलेले आहे.

# उज्जैनी ग्राम पंचायतीची यशोगाथा

- ग्राम पंचायत उज्जैनी ही तीन महसूल गाव ( उज्जैनी,सातरोंडे,वि–हे) व पाच पाडे यांची मिळून तयार झाली आहे.
- वाडा मुख्यालयापासून ग्राम पंचायतीचे अंतर 38 कि.मी आहे.
- 2005 मध्ये आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे उज्जैनी हे गाव पुर्णपणे बेचीराख झाले होते.
- उज्जैनी करीता वाडा ही एकमेव बाजारपेठ आहे.दैनंदिन जीवनाशी सर्व साधने खरेदी करण्याकरीता तब्बल 100 रुपये मोजून व एक तास प्रवास करुन वाडा येथे जावे लागते.
- इथे अनेक मुलभूत सुविधांची वाणवा आहे.
  पिण्याच्या पाण्याची टंचाई,पुरेसा रोजगार नाही,दळणवळणाची अपुरी साधने,मोबाईल अथवा दुरध्वनी सुविधा नाही.
- परंतु विकासाची आस असणा–या उज्जैनी ग्राम पंचायतीचे ग्रामस्थ सर्व समस्यांवर मात करुन आपल्या उन्नतीसाठी झटत आहेत.
- पंचायत समितीचे प्रशासन,पालक अधिकारी श्री उमेश खिराडे ,सरपंच बाळा लहांगे ,ग्रामसेवक श्री दत्तात्रेय गव्हाणे यांचे मार्गदर्शन प्रमाण मानून ग्रामस्थांनी विकासासाठी कंबर कसली.
- सन 2012 मध्ये झालेल्या शौचालयाच्या बेसलाइन सर्वेक्षणानुसार 139 कुटूंब शौचालयाविना होती.यापैकी 104 कुटूंबांना 12000रु प्रमाणे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत लाभ देणे शक्य होते.परंतू 35 कुटूंबांना लाभ देणे काही कारणास्तव शक्य नव्हते.
- 15 नोव्हेंबर 2014 मध्ये वरील सर्व लाभार्थ्यांची शौचालय बांधकामाची मोहिम पालक अधिकारी श्री उमेश खिराडे यांच्या नेतृत्वाखाली व मा.श्री निखील ओसवाल ,गटविकास अधिकारी पं.स.वाडा व मा.श्री विजय सुर्यवंशी ,मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.
- जे गाव हगणदारीमुक्त असते त्या गावाला सरकार दरबारी मान असतो व विकासाच्या सर्व योजना राबविण्याकरीता त्या गावाला प्राधान्य देण्यात येते या पध्दतीने ग्रामस्थांच्या मानसिकतेत बदल करण्याचा प्रयत्न केला गेला.
- परंतू मानसिकतेत बदल करणे ही बाब तितकीशी सोपी नव्हती ,येणा–या प्रत्येक अडथळयाला उपाय शोधले गेले.यासाठी अनेक नावीन्यपुर्ण उपक्रम राबविले गेले.
- शाळेतील मुलांचा स्वच्छतादुत म्हणून प्रभावी वापर करुन त्यांच्या पालकांपर्यन्त स्वच्छतेचे संदेश घेवून पाठविण्यात आले.मुलांना स्वत: अजेंडा व पत्र वाचून दाखविण्यात आले. त्या पत्रामध्ये सन्मानाने शौचालय बांधकाम करणे विषयी आवाहन करण्यात आले होते.
- वैयक्तिक गृहभेटीवर भर दिला.लाभार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण व्हावा यासाठी सभांचे आयोजन केले गेले.शौचालय बांधकामपुर्ण करणा–या लाभार्थ्यांना अनुदानाचा धनादेश 10 दिवसांच्या आत घरपोच सन्मानपुर्वक देण्यात आला.अशा अनेक कल्पना राबविण्यात आल्या.

- वरील सर्व उपक्रमांना ग्रामस्थांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला त्यामुळेच केवळ 45 दिवसात 139 शौचालयांचा लक्षांक 31 डिसेंबर 2014 पूर्वी ग्राम पंचायतीने पुर्ण करुन पालघर जिल्हयाला नववर्षाची भेट दिली..
- या 139 पैकी 35 शौचालयांचे बांधकाम करणे अतिशय कठीण होते. कारण रुपये 12000/ चा लाभ देणे काही कारणस्तव शक्य नव्हते.परंतू त्या लाभार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने शौचालयाचे बांधकाम केले.काहींनी स्वतः वीटा बनविल्या.काहींनी परिसरातील उपलब्ध साहित्य स्वतःच्या डोक्यावर 5 कि.मी.अंतरापर्यन्त वाहून नेले. अशा अनेक प्रयत्नांच्या जोरावर उज्जैनी हे गाव पालघर जिल्हयातील सर्वात वेगाने हागणदारीमुक्त झालेली ग्रामपंचायत म्हणून देशाच्या स्वच्छतेच्या नकाशावर आली आहे.
- या बरोबर गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी प्रत्येक आठवडयातील सोमवार व शनिवार हे दोन दिवस स्वच्छतादिन म्हणून पाळले जातात.आज सोमवार /शनिवार करु स्वच्छ घर शिवार हा नारा दिला जातो.या दोन दिवसांत सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने गाव स्वच्छता मोहिम राबविली जाते.
- कचरा कचराकुंडीतच टाकावा ,त्याची योग्य विल्हेवाट लावावी अशी शिस्त ग्रामस्थांनी स्वयंप्रेरणेने बाळगली आहे.
- आसपासच्या जंगलातील सहजतेने उपलब्ध असलेल्या लाकडांचा गावाच्या सौंदर्यासाठी अतिशय उत्कृष्ट वापर या वनवासींनी केला आहे. त्यांनीअतिशय कल्पकतेने रस्त्याच्या दुतर्फा लाकडाचे सुंदर कुंपण करुन गावाच्या सौदर्यात भर घातली आहे.
- शौचालयाला दिलेल्या एकसमान रंगसंगतीने व नामफलकांमुळे सर्व शौचालये गावाचे भुषण ठरली आहेत.
- अशा प्रकारे कोणत्याही अडचणींना दाद न देता प्रत्येक प्रश्नाला उत्तर शोधत गावाने स्वच्छतेची यशोगाथा रचली.
- या यशोगाथेचा साक्षीदार होण्यासाठी मा.श्री डॉ विजय सुर्यवंशी ,मुख्यकार्यकारी अधिकारी ,जि.प.पालघर यांनी वाडा तालुक्यातील सर्व ग्रामसेवक व पालक अधिकारी यांचा व्यापक अभ्यासदौरा दिनांक 8/1/2015 रोजी उज्जैनी येथे आयोजीत केला व ग्रामस्थांचे भरभरुन कौतुक केले.या यशोगाथेचे शिल्पकार श्री उमेश खिराडे ,पालक अधिकारी व श्री दत्तात्रेय गव्हाणे ,ग्रामसेवक यांना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत उत्कृष्ट कामगीरीबददल मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या पदकाने गौरविण्यात आले. .

- स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कुटुंबस्तर संवाद अभियान मध्ये पथनाटय सादर करतांना श्री.उमेश गरुजी व त्यांचे सहकारी








समाजाला वाचनाची गोडी लागावी यासाठी मोफत वाचनालय मौजे जामघर येथे (गुरुजींचे जन्मस्थान) सुरु करण्यात आले. उद्घाटन प्रसिद्ध गीतकार मा. श्री गुरु ठाकूर यांच्या शुभहस्ते.




वाचनालयाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना गुरुजी

3




पंचायत समिती वसई, येथे उज्जैनी येथील शौचालय बांधकाम १००% केल्याने कार्यशाळेत मार्गदर्शन केल्यानंतर मा. सभापती, वसई यांच्या हस्ते श्री खिराडे गुरुजींना गौरविण्यात आले.



६० वर्षानंतर प्रथमच जि.प. शाळा उज्जैनी येथील अतिदुर्गम भागातील नाल्याला ओलांडणाऱ्या वाहेरू डोंना सभापती.



- लायन्स क्लब तर्फे उजैनी, मेघावलपाडा कोनसाई येथे शिलाई मशिनचे च वाटप करण्यात आले



मा.मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद पालघर, श्री. डॉ.विजय सुर्यवंशी व गट विकास अधिकारी श्री. निखील ओसवाल श्री. उमेश खिराडे यांचा सतकारकरतांना




मा.मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद पालघर, श्री. डॉ.विजय सुर्यवंशी व गट विकास अधिकारी श्री. निखील ओसवाल श्री. उमेश खिराडे हे स्वछ भारत मिशन अंतर्गत शौचालय तसेच गावाची पाहणी करतांना





- स्वच्छ उज्जैनी गाव



2 ऑक्टोबर 2016 रोजी कुटुंबस्तर संवाद अभियानामध्ये स्वछता पालखीचे आगमन झाल्यानंतर वसई येथे पथनाटय सादर करतांना



2 ऑक्टोबर 2016 रोजी माटुंगा येथे स्वच्छता पालखी च्या अनावरण मा. मुख्यमंत्री. श्री. देवेंद्र फडणविस यांच्या हस्ते करण्यात आले प्रसंगी मा. ग्राम विकास मंत्री. श्रीम.पंकजाताई मुंडे, मा. शिक्षणमंत्री. श्री.विनोद तावडे , मा. राज्यमंत्री ग्राम विकास श्री.दादा भुसे  मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर, श्रीम. निधी चौधरी, गट विकास अधिकारी, श्रीम. शितल पुंड मॅडम.





2 ऑक्टोबर 2016 रोजी माटुंगा येथे स्वच्छता पालखी च्या अनावरण प्रसंगी पथनाटय सादर करतांना श्री. उमेश गुरुजी व त्यांचे सहकारी



**ध्यन्यवाद**